प्रेस नोट

गडचिरोली जिल्हयातील लिपीक -टंकलेखक व तलाठी पदाची परीक्षा दि. ३१.१.२०१०

गडचिरोली जिल्हयातील लिपीक-टंकलेखक व तलाठी पदांच्या रिक्त जागा भरण्यासाठी लेखी परीक्षा दि. ३१.१.२०१० ला दुपारी १२.०० ते १.३० वा दरम्यान घेण्यात येत आहे. यासाठी उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात आलेले आहेत. उमेदवाराने प्रवेश पत्रावर अलीकडील काळातील फोटो चिपकवून राजपत्रित अधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक इत्यादीद्वारे सांक्षाकित करुन परीक्षेसाठी प्रवेशपत्रासह हजर राहावे. पात्र उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाचे सूचना फलकावर तसेच www.gadchiroli.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. ज्या पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र पोस्टाद्वारे प्राप्त झाले नसेल, त्यांनी दिनांक ३०.१.२०१० पर्यन्त जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयात अर्ज सादर करुन परीक्षा प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे व परीक्षेसाठी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर हजर राहावे. अशा सूचना जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी दिल्या आहेत.

पृष्ठा.पत्र क्रं. कार्या-२/अका/आस्था-१/ /२०१०
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, गडचिरोली.
दिनांक- जानेवारी, २०१०

प्रतिलिपी-

१) जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांनी वरील सुचना सर्व प्रादेशिक वृत्त पत्र व स्थानिक वृत्त पत्रात दि. २५.१.२०१० पर्यन्त प्रसिध्द करावी.

२) उपविभागीय अधिकारी (सर्व) ----------/तहसिलदार, (सर्व) ----------
त्यांनी वरील सूचना त्यांचे कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करावी.

नि.उ.जि.
जिल्हाधिकारी, गडचिरोली करिता.